# मुंबई विद्यापीठ

क्र.१२/२०२१-२२

मसुदा गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२२ मधील २४ फेब्रुवारी, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बारावी सभा गुरूवार, **दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी २.०० वाजता** आयोजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणामुळे खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा आभासी पध्दतीने घेण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ५. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ७. | डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १४. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १५. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

- **स्वागत** :- सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

- **अनुपस्थिती** :- डॉ. सोनाली रोडे, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. प्रविण कुमार सोब्ती**

प्रसिध्द अभिनेते आणि आशियाई क्रिडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू श्री प्रविण कुमार सोब्ती यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०७ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते.

**श्री. संतोष कोचरेकर**

ज्येष्ठ नाटयनिर्माते श्री संतोष कोचरेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०९ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

**श्री. आर. आर. सिंह**

मुंबईचे माजी महापौर व कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री रामचरित्र रामभजन तथा आर. आर. सिंह यांचे दिर्घ आजाराने दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८४ वर्षांचे होते.

**श्री. रवि टंडन**

प्रसिध्द निर्माते, दिग्दर्शक श्री रवि टंडन यांचे अल्पशा आजाराने दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षाचे होते.

**श्री. राहुल बजाज**

ज्येष्ठ उद्योगपती, बजाज उद्योग समुहाचे सर्वेसर्वा श्री राहुलकुमार कमलनयन बजाज यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**श्री. रमेश भारतलाल**

ज्येष्ठ चित्ररकार श्री रमेश भारतलाल यांचे अल्पशा आजाराने दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

**श्री. नरेंद्र लांजेवार**

विदर्भ साहित्य संघाच्या बुलढाणा शाखेचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक, ग्रंथपाल श्री. नरेंद्र लांजेवार यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५४ वर्षांचे होते.

**श्री. दासबाबू**

मराठीतील लोकप्रिय मालिका तसेच चित्रपटांचे निर्माते-दिग्दर्शक श्री. दासबाबू यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

**श्री. बप्पी लहरी**

प्रसिध्द संगीतकार श्री. बप्पी लहरी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते.

**श्री. सुधीर जोशी**

माजी मंत्री, मुंबईचे माजी महापौर आणि शिवसेनेचे ज्येष्ठे नेते श्री. सुधीर जोशी यांचे दिर्घ आजाराने दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते.

**श्री. महेश घाटपांडे**

लेखक, गझलकार, कवी श्री. महेश घाटपांडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५१ वर्षाचे होते.

| अनु. क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दि. २४ जानेवारी, २०२२ आणि दि. ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २४ जानेवारी, २०२२ आणि ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्ताची बाब कार्यक्रमपत्रिकेतून वगळण्यात आली. | |
| बाब क्र. २ | व्यवस्थापन परिषद दिनांक २८ ऑगस्ट, २०२० चा कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक २८ ऑगस्ट, २०२० चा कार्यवाही अहवालास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ३ | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीतील बाब क. १० मधील विषय व ठरावामध्ये दुरूस्ती आणि बाब क. १८ च्या ठरावात दुरूस्ती करणेबाबत. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीतील गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्था यांच्या बाब क. १० मधील विषय व ठरावामध्ये दुरूस्ती आणि बाब क. १८ च्या ठरावात दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. (दुरुस्तीबाबतचे परिशिष्ट 'अ' सोबत जोडले आहे.) | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. ४ | मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत पालघर, सिंधुदुर्ग व रायगड जिल्हयात मुंबई विद्यापीठाचे उपपरिसर सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता सादर. | शैक्षणिक नेमणूक गुणवत्ता आणि हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत पालघर, सिंधुदुर्ग व रायगड जिल्हयात मुंबई विद्यापीठाचे उपपरिसर सुरु करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच या उपपरिसरांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार शासनाकडून विद्यापीठास जे देय असेल त्यानुसार मागणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा असे ठरले. | |
| बाब क्र. ५ | मुंबई विद्यापीठाचे सन २०२१-२०२२ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व २०२२-२०२३ चा अर्थसंकल्पीय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाचे २०२१-२०२२ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पिय अंदाजाच्या मसुदयास मान्यता देण्यात आली.<br><br>वित्त व लेखा अधिकारी यांनी २०२१-२०२२ चे सुधारीत अर्थसंकल्पिय व २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा सादर केला. त्यांना प्रा. (डॉ.) अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दि. २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र. १ अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशीनुसार मुंबई विद्यापीठाचे २०२१-२०२२ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पीय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) प्रमाणे अधिसभेच्या मान्यतेकरिता सादर करावा, अशी शिफारस करण्यात आली. तसेच डॉ. सी.ए. प्रदीप कामथेकर, वित्त व लेखा अधिकारी यांना २०२१-२०२२ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसूदा व सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा अधिसभेमध्ये सादर करण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आले. | |

| | अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय | |
|---|---|---|
| बाब क्र. ६ | ASICON 2022 आयोजित करण्याकरीता दिनांक ५ डिसेंबर, २०२२ ते १ जानेवारी, २०२३ या कालावधीकरीता विद्यानगरी परिसरातील मोकळी जागा उपलब्ध करून देण्याबाबत. | सामान्य प्रशासन विभाग विद्यानगरी |
| ठराव | असोसिएशन ऑफ सर्जनस् आफ इंडिया (ASI) ही भारतातील ३० हजार पेक्षा अधिक शल्यविशारद सदस्य असलेली संस्था आहे. या संस्थेमार्फत दरवर्षी डिसेंबर महिन्यामध्ये ASICON या नावाने राष्ट्रीय वार्षिक परिषद घेतली जाते. ASICON 2022 ही राष्ट्रीय वार्षिक परिषद आयोजित करण्याकरीता दि. ५ डिसेंबर, २०२२ ते दि. १ जानेवारी, २०२३ या कालावधीकरीता विद्यानगरी परिसरातील मोकळी जागा विद्यापीठाने याबाबत गठीत केलेल्या समितीच्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे विद्यापीठाने तयार केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. | |
| बाब क्र. ७ | श्री. राजेंद्र नाथा आंबवडे, सेवानिवृत्त उपकुलसचिव (निलंबित) यांच्या बद्दलचा विभागीय चौकशी अहवाला मा. व्यवस्थापन परिषदेच्या समोर चर्चेसाठी व योग्य तो निर्णय घेण्यासाठी सादर. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | श्री. राजेंद्र नाथा आंबवडे यांच्या विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली व मा. सदस्यांनी आपापली मते मांडली अंतिमत: श्री. राजेंद्र नाथा आंबवडे यांना शिक्षा देण्याबाबत बहुमताने ठरले की, श्री. राजेंद्र नाथा आंबवडे यांना सेवानिवृत्तीपुर्वीच्या पाच वेतनवाढ मागे घेण्याची शिक्षा देण्यात यावी. यास श्री. राजन कोंळबेकर, श्री. प्रदिप सावंत व डॉ. वैभव नरवडे यांनी असहमती नोंदविली. | |
| बाब क्र. ८ | विद्यापीठाच्या कलिना परिसरातील महात्मा फुले भवन शेजारील नवीन इमारतीस (जिचा काही भाग परीक्षा विभागासाठी वापरला जाणार आहे) 'छत्रपती शिवाजी महाराज भवन' असे नाव देण्याबाबतच्या मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन परिषदेच्यासमोर सादर. | |

| | | |
|---|---|---|
| ठराव | विद्यापीठाच्या कलिना परिसरातील महात्मा फुले भवन शेजारील नवीन इमारतीस (जिचा काही भाग परीक्षा विभागासाठी वापरला जाणार आहे) 'छत्रपती शिवाजी महाराज भवन' असे नाव देण्याबाबतच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू

परिशिष्ट 'अ'

## व्यवस्थापन परिषद दिनांक २४/०२/२०२२ बाब क्र. ३

| | | |
|---|---|---|
| | दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील | |
| बाब क्र. १० | **Item for change in nomenclature & ordinance number as per UGC nomenclature rules which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021, is placed before M.C. for its approval.** | |
| ठराव | It was resolved that the item for change in nomenclature & ordinance number as per UGC nomenclature rules which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021 be accepted.<br><br>Arising out of discussion, it was unanimously resolved that henceforth for GICED and for any other Institution, before signing the MOU, University Committee will visit personally to the place of Institution for inspection, Submit its report to University and then only the final decision will be taken. | |
| | व्यवस्थापन परिषद दि. २७ सप्टेंबर, २०२१ बाब क्र. १० बाबतचा<br>सुधारित ठराव | |
| बाब | **Item for change in nomenclature & ordinance number as per UGC nomenclature rules is as follows:**<br><br>**1.**Bachelor of Custom Clearance Freight Forwarding & Logistics **(Nomenclature requested BMS (Custom Clearance, Freight Forwarding &Logistics)**<br><br>**2.**Bachelor of Jewellery Design Innovation & Technology (B. JDIT) **(Nomenclature requested Bachelor of Design (Jewellery Design, Innovation &Technology)**<br><br>**3.**Master of Event Management **(Nomenclature requested MA (Event Management &Public Relations)**<br><br>**4.**Bachelor of Applied Art (Advertising Communication Design) **(Nomenclature requested as BA (Advertising Communication Design)**<br>Which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021, is placed before M.C. for Approval. | |

| | | |
|---|---|---|
| ठराव | It was resolved that the item for change in nomenclature and ordinance number as per UGC nomenclatures rules which is resolved in the A.C. meeting dated 23/02/2021 as follows be accepted.<br>**1.**Bachelor of Custom Clearance Freight Forwarding & Logistics<br>**(Nomenclature requested BMS (Custom Clearance, Freight Forwarding &Logistics)**<br>**2.**Bachelor of Jewellery Design Innovation & Technology (B. JDIT)<br>**(Nomenclature requested Bachelor of Design (Jewellery Design, Innovation &Technology)**<br>**3.**Master of Event Management<br>**(Nomenclature requested MA (Event Management &Public Relations)**<br>**4.**Bachelor of Applied Art (Advertising Communication Design)<br>**(Nomenclature requested as BA (Advertising Communication Design)**<br>Arising out of discussion, it was unanimously resolved that henceforth for GICED and for any other Institution, before signing the MOU, University Committee will visit personally to the place of Institution for inspection, Submit its report to University and then only the final decision will be taken. | |
| | दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील | |
| बाब क्र. १८ | **गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करण्याबाबत.** | |
| ठराव | गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या Title of Course मध्ये दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली.<br><u>व्यवस्थापन परिषद दि. २७ सप्टेंबर, २०२१ बाब क्र. १८ बाबतचा</u><br><u>सुधारित ठराव</u><br>गरवारे व्यवसाय शिक्षण व विकास संस्थेच्या B.A. (Sports Management) अभ्यासक्रमाच्या नावात बदल करून B.M.S. (Sports Management) अशी दुरूस्ती करण्यास मान्यता देण्यात आली. | |

सही/-
कुलसचिव